दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com vadalvartanews@gmail.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार २१ जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक ३१३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# मराठा आणि ओबीसी आरक्षणावर प्रकाश आंबेडकर यांचं मोठं विधान,

**परिस्थिती स्फोटक** राज्यात सामाजिक सलोखा राहिला पाहिजे. तुम्ही उपोषण सुरू ठेवायला हरकत नाही. पण पाणी घ्या. पाणी पिऊन उपोषण करा. तुम्ही पाणी घेत राहाल ही आशा आहे. सध्या तरी आरक्षणाच्या प्रश्नावर शासनाकडून कोणतंही पाऊल पडताना दिसत नाही. ओबीसी आणि मराठा समाज अनेकवेळा आमनेसामने आला आहे. परिस्थिती स्फोटक असल्याची जाणीव मी अनेकवेळा शासनाला करून दिली आहे. शाश्वत आरक्षण निघून जाते की काय अशी भीती भटक्या विमुक्तांनाही वाटत आहे. याबाबत शासनाने चर्चा केली पाहिजे. राजकीय पक्षांनी भूमिका घेतली पाहिजे. या परिस्थितीतून मार्ग काढला पाहिजे, असं सांगतानाच आरक्षणावर आम्ही आमची भूमिका आधीच जाहीर केली आहे, असंही त्यांनी सांगितलं.



## मराठा आणि ओबसींच्या आरक्षणाचे ताट वेगवेगळे असले पाहिजे

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी मराठा आणि ओबीसीच्या आरक्षणावरून आज मोठं विधान केलं आहे. मराठा आणि ओबीसींचं ताट वेगळं असलं पाहिजे, असं मोठं विधान प्रकाश आंबेडकर यांनी केलं आहे. त्यामुळे आता मनोज जरांगे पाटील काय प्रतिक्रिया देतात याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. प्रकाश आंबेडकर यांनी आज वडीगोद्रीत जाऊन ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांची भेट घेतली. हे दोन्ही नेते उपोषण करत आहेत. त्यामुळे आंबेडकर यांनी त्यांची विचारपूसही केली मराठा समाजाला आरक्षण द्यायचं असेल तर त्यांचे ताट वेगळे ठेवले पाहिजे. मराठा आणि ओबीसींना एकमेकांसमोर भिडवत ठेवलं जात आहे. विधानसभेपर्यंत त्यांना भिडवत ठेवलं जाईल, अशी माझी धारणा आहे. कुटुंबाची सत्ता ठेवायची असेल तर आरक्षण मिळाले पाहिजे. पक्षाची सत्ता यावी असं वाटत असेल तर सलोख्याची भाषा वापरली गेली पाहिजे, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले. मराठा असो की ओबीसी... संविधान वाचलं तरच सर्वांना आरक्षण आहे. भाजप किती संविधान बदलणार? आता संविधानाच्या बाजूने निकाल लागला आहे. जनतेचा कौल महाविकास आघाडीकडे गेला आहे. ओबीसींनी संविधानावर विश्वास ठेवला तर आरक्षण वाचलं जाऊ शकतं, असं प्रकाश आंबेडकर यांनी सांगितलं. मनोज जरांगे यांच्याशी माझं मागे बोलणं झालं होतं. त्यावेळी सगेसोयऱ्याची व्याख्या तुम्ही करा. किंवा कुणाकडून तरी करून घ्या, असं सांगितलं

## अंबाजोगाईत लक्ष्मण हाके समर्थनार्थ ओबीसीचे टायर जाळून रस्ता रोको आंदोलन

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील वडीगोद्री येथे ओबीसी आरक्षण बचावाचे नेते लक्ष्मण हाके यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा म्हणून अंबाजोगाई येथे आंदोलकांनी रस्त्यावर टायर जाळले व रस्ता रोको आंदोलन केले. अंबाजोगाई येथे दि.२० जून गुरुवार रोजी सकाळी ओबीसी समर्थकांनी जालना जिल्ह्यातील वडीगोद्री येथे ओबीसी आरक्षण बचावचे नेते लक्ष्मण हाके यांनी सुरु केलेल्या उपोषणास पाठिंबा म्हणून अंबाजोगाई शहरातील भगवान बाबा चौक येथे दोन तास रस्ता रोको आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी रस्त्यावर टायर जाळून रस्ता अडविण्यात आला. यावेळी आरक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं, एक पर्व ओबीसी सर्व अशा घोषणा यावेळी आंदोलकांनी दिल्या. अचानक झालेल्या या रस्ता रोको आंदोलनामुळे अंबाजोगाई - परळी रस्त्यावरील वाहतूक दोन तास ठप्प झाली होती. यावेळी संतप्त ओबीसी बांधवांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या. यावेळी ओबीसी समाज आक्रमक झाला होता.यावेळी पोलिसाकडून चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आंदोलन करणाऱ्या ओबीसी कार्यकर्त्यांकडून विविध मागणीचे निवेदन नायब तहसीलदार सौ. स्मिता बाहेती म्याडम यांना देण्यात आले. या आंदोलनात जेष्ठ नागरिक, महिला, युवक बहुसंख्येने सहभागी झाले होते.

## भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या 26 वर्धापन दिनानिमित्त पुनंदगाव येथे वृक्षारोपण संपन्न

माजलगाव, (प्रतिनिधी):-माजलगाव तालुक्यातील पुनंदगाव याठिकाणी भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या वतीने वृक्षारोपण केले यावेळी भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष परमेश्वर सोळंके व माजलगाव तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर गायकवाड यांनी भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या 26 वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन बीड जिल्ह्यात ठेवण्यात आलेले होते तर माजलगाव मध्ये पुनंदगाव या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले या वेळी तेथील उपसरपंच मिसाळ साहेब ग्रामसेवक शिंदे साहेब जिल्हाध्यक्ष परमेश्वर सोळुंके समितीचे तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर गायकवाड पत्रकार अमर साळवे पत्रकार पृथ्वीराज निर्मळ पत्रकार विजय डावरे पत्रकार राजरतन डोंगरे पत्रकार दर्शन डोंगरे संजय गायकवाड,शेखर सांवत,कर्णराज कुरे,सुमित कुंभार,कटारे सर,सहशिक्षक व पुनदगाव चे गावकरी यांची प्रमुख उपस्थित होती

# संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील शोला बीडकरांचा प्रचंड प्रतिसाद

## रुपेशराजे बेद्रे पाटील यांनी केले आयोजन; जरांगे पाटील यांचा जीवनप्रवास पाहून बीडकर भारावले

### अख्खे थिएटर झाले हाऊसफुल्ल

**मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांचा संघर्ष या चित्रपटाच्या माध्ममातून जनतेसमोर यावा म्हणून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा मराठवाडा मराठा क्लबचे अध्यक्ष रुपेशराजे बेद्रे पाटील यांच्या सौजन्याने संतोषीमाता ई स्केअरमध्ये पहिला शो आयोजित करण्यात आला होता. चित्रपटाला राज्यभर मिळत असलेला प्रतिसाद पाहून रुपेशराजे बेद्रेपाटील यांनी ५११ प्रेक्षक क्षमता असलेले संतोषीमाता ई स्केअर हे अख्खे थिएटर बुक केले होते. या चित्रपटाला बीडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने रुपेशराजे यांनी बुक केलेले अख्खे थिएटर हाऊसफुल्ल झाले होते. अनेकांनी उभा राहून चित्रपट पाहिला. चित्रपट संपल्यानंतर प्रेक्षकांनी रुपेशराजे बेद्रेपाटील यांचे कौतूक करत सत्कारही केला.**

### सर्व समाजाकडून मिळाला प्रतिसाद : रुपेशराजे बेद्रेपाटील

**मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील हे नेतृत्व अंतरवलीतील घटनेमुळे राज्यासमोर आले आहे. मात्र जरांगे पाटील हे गेल्या अनेक वर्षपासून मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी लढा देत आहेत. मराठा समाजासाठी त्यांनी जीवन समर्पित केले आहे. त्यांचा आताचा संघर्ष राज्यभरातील जनतेने पाहिला आहे, मात्र त्यांचा हा संघर्ष अनेक वर्षंपासूनच आहे. जरांगे पाटील यांचा पूर्वीचा संघर्ष कसा होता हे समाजासमोर आले पाहिजे या उद्‌देशाने आम्ही आज संपूर्ण थिएटर बुक करुन आजचा शो मोफत ठेवला होता. केवळ मराठाच नव्हे तर सर्व समाजाने हा चित्रपट पाहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पाटोदा तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी मोठा प्रतिसाद दिला असे शोचे आयोजक रुपेशराजे बेद्रे पाटील यांनी सांगितले.**





**बीड (प्रतिनिधी)** मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे केवळ यशच नव्हे, तर संघर्ष सर्वांसमोर आणायचा आहे. जरांगे पाटील फक्त अंतरवलीत झालेल्या लाठीचार्जच्या घटनेमुळे मुळे मोठे झाले नाहीत, तर त्याआधी ही त्यांच्या जीवनात अनेक संघर्ष होते, हेच राज्याच्या समोर आणायच्या उद्दिष्टाने "संघर्ष योद्ध मनोज जरांगे पाटील" चित्रपट तयार करण्यात आला. गुरुवारी (दि.20) बीड येथे या चित्रपटाचे प्रमोशन करण्यात आले. बीड जिल्ह्यातील फक्त मराठा समाजाचे नव्हे तर सर्व समाजाने हा चित्रपट पाहावा, या उद्देशाने राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा मराठवाडा मराठा क्लबचे अध्यक्ष रुपेशराजे बेद्रेपाटील यांनी आजचा शो बीडकरांसाठी मोफत आयोजित केला होता. चित्रपटातील मनोज जरांगे पाटील यांचा जीवन प्रवास पाहून बीडकर भारावले होते. मराठा आरक्षणासाठी हायकोर्टात महाराष्ट्रातील पहिले कॅव्हेट रुपेशराजे बेद्रेपाटील यांनी दाखल केले होते. मराठा आरक्षणासंदर्भात आंदोलनात्मक भूमिकेतून सरकारसोबत संघर्षाची भूमिका स्वीकारणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या जीवनावर आधारित 'संघर्ष योद्धा' चित्रपट १४ जून रोजी प्रदर्शीत झाला. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा मराठवाडा मराठा क्लबचे अध्यक्ष रुपेशराजे बेद्रेपाटील यांच्या सौजन्याने गुरुवारी (दि.20) बीड येथील संतोषीमाता ई स्केअर येथे चित्रपटाचे जोरदार प्रमोशन करण्यात आले. या चित्रपटात अभिनेता रोहन पाटील याने प्रमुख भुमिका साकारली आहे. शिवाजी दोलताडे यांनी या चित्रपटाची निर्मीती आणि दिग्दर्शन केले आहे. डॉ.सुधीर निकम यांनी या चित्रपटातील संवाद आणि पटकथा लिहिली आहे. अभिनेता संदीप पाठक, सागर कारंडे, अरबाज शेख, अभिनेता मोहन जोशी आदींनी चित्रपटात महत्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. दरम्यान गुरुवारी चित्रपटाचे प्रमोशन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते बळीआप्पा गवते, कुंदाताई काळे, भागवत मस्के, हनुमंत मुळीक, राहुल वायकर, तुकाराम कागदे, गणेश मस्के, संदिपान बडगे, राहुल कदम, अशोक सुखवसे, मनोज जगदाळे पाटील, संदीप अडाले, निलेश बेद्रेपाटील साहेबराव बेदरे पाटील विठ्ठलराव तांबे, विकास तांबे ,बाळासाहेब तांबे, बालाजी कवठेकर, कल्याण औटे ,शरद उबाळे, सय्यद सलीम यांची उपस्थित होते.

**मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांचा संघर्ष या चित्रपटाच्या माध्ममातून जनतेसमोर यावा म्हणून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा मराठवाडा मराठा क्लबचे अध्यक्ष रुपेशराजे बेद्रे पाटील यांच्या सौजन्याने संतोषीमाता ई स्केअरमध्ये पहिला शो आयोजित करण्यात आला होता. चित्रपटाला राज्यभर मिळत असलेला प्रतिसाद पाहून रुपेशराजे बेद्रेपाटील यांनी ५११ प्रेक्षक क्षमता असलेले संतोषीमाता ई स्केअर हे अख्खे थिएटर बुक केले होते. या चित्रपटाला बीडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने रुपेशराजे यांनी बुक केलेले अख्खे थिएटर हाऊसफुल्ल झाले होते. अनेकांनी उभा राहून चित्रपट पाहिला. चित्रपट संपल्यानंतर प्रेक्षकांनी रुपेशराजे बेद्रेपाटील यांचे कौतूक करत सत्कारही केला.**

कविता

## पूरग्रस्त

पूरग्रस्ताचे मनोगत
काय सांगू तुम्हाला
झाले सर्व उध्वस्त
कसे कळे न मला

संसाराचे झाले वाटोळे
लागले संसाराला ग्रहण
वाहून गेले काही आप्त पूरात
बेजार झाले माझे मन

दिशाहीन प्रवास आता
कसे गाठावे ध्येय निरंतर
न थांबता चाललो मी
पार कराया कठीण अंतर

पूराचा तडाखा मला
चिंब भिजवून गेला
आसवांची अभंग ओवी
नयनी भरून गेला

कसे सावरावे मनाला
कसे एकवटावे बळ
सर्व काही नासून गेले
लागली मनाला पूराची झळ

लैलेशा भुरे
नागपुर

# ओबीसी समाजाच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी नायगाव तहसील समोर लाक्षणिक उपोषण...!



## ओबीसीच्या ताटातले आरक्षण मागू नका--- नायगाव ओबीसी संघर्ष समिती

**गेल्या सात दिवसापासून वडीगोद्री येथे उपोषणाला बसलेल्या प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची प्रकृती खालवल्याने सरकारच्या निषेधार्थ नायगाव तहसील कार्यालयासमोर ओबीसी समाजाच्या वतीने एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्यात आले आहे. सोनखेडकर म्हणाले,डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान वितरिक कोणाला काही करता येणार नसून देशाचे संविधान टिकले तरच सर्वांचे आरक्षण टिकेल म्हणून ओबीसी समाजाच्या आरक्षणाला हात लावले तर इतर अन्य समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू शकते त्यामुळे सर्वांनी एकत्रितपणे येणाची गरज असून मराठा समाजाने ओबीसीच्या ताटातले आरक्षण मागू नये अथवा सरकार देऊ नये अन्यथा ओबीसी समाज रस्त्यावर उतरल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही, असा इशारा देखील सूर्यकांत सोनखेडकरांनी दिला आहे...**

नायगाव/हानुमंत चंदनकर ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांसाठी वडगोद्री येथे लक्ष्मण हाक्के यांचे मागील आठ दिवसांपासून चालु असलेल्या उपोषणला पाठिंबा म्हणून नायगाव तहसील कार्यालयासमोर दि.19 जुन 2024 रोजी नायगाव तालुका संघर्ष समितीच्या वतीने लाक्षणिक उपोषण करण्यात आले. असून उपोषणाला समाज बांधवाचा चांगला प्रतिसाद मिळाला तर ओबीसी समाजाच्या विविध मागण्याचे निवेदन तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड यांनी स्वीकारून आपल्या मागण्या शासनस्तरावर पाठवल्या जातील असे उपोषणकर्त्यांना सांगितले.

ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता यासह विविध मागण्या घेऊन जालना जिल्ह्यातील वडगोद्री येथे ओबीसीं समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांनी अमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला पांठीबा म्हणून नायगांव तालुक्यातील ओबीसी बांधवाने नायगांव येथील तहसील कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण केले आहे.

त्या अनुषंगाने ओबीसीच्या मुळ आरक्षणाला मराठा समाजाला समावेश करू नये,ओबीसीची जातनिहाय जनगणना करण्यात यावी,तसेच कुणबीच्या बोगस नोंदी रद्द करण्यात याव्यात, प्रत्येक जिल्ह्यात ओबीसीचे वसतिगृह व्हावे .या उपोषणकर्त्यांच्या मागण्याकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देण्यासाठी असंख्य ओबीसी बांधवांनी सरकारच्या विरुद्ध नायगाव येथे घोषणा बाजी केली. यावेळी सूर्यकांत सोनखेडकर,नायगावचे नगरसेवक विठ्ठल बेळगे, देविदास बोमनाळे,प्रभाकर लखपत्रेवार, रामप्रसाद चन्नावार. गोंविद नरसीकर,नीळकंठ तकबीडकर,माधव चितले, साईनाथ जिगळेकर,विकास भुरे,संभाजी खडके,राजू बेळगे, गणेश कंदुर्गे, सुभाष चुट्टेवाड,माधव कोरे,रामकिशन पालनवार,दत्तात्रय रातोळीकर,व्यंकट केते,विश्वनाथ बोमनाळे,शिवराज नागठाणे,दिंगबर मावले, नागेश कव्हाळे,रंगराव लव्हाळे,ओम पाटील धानोरकर,गणेश पाटील,नागेश कहाळेकर,यासह असंख्य ओबीसी समाजाच्या बांधवांची उपोषणास उपस्थित होते. उपोषण स्थळी जि.प.सदस्य माणिकराव लोहगावे, परमेश्वर पाटील धानोरकर,डॉ.मधुकर राठोड, बालाजी तुपेकर, बालाजी पवार, यासह अनेक मान्यवर मंडळीनी भेट दिली.

# वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा रविवारी गुणगौरव सोहळा

## कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**बीड/प्रतिनिधी**

वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता १० वी आणि १२ वी वर्गातील विद्यार्थ्यांचा सार्वजनिक बांधकाम बीड आणि अंबाजोगाई विभागाचे कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी यांच्या शुभहस्ते रोख रकमेसह सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात येणार आहे. या पुरस्कारास पात्र असलेल्या गुणवंत विद्यार्थी आणि त्यांच्या पाल्यांनी नोंदणी करून पुरस्कार स्वीकारण्यासाठी आपल्या संपूर्ण परिवारासह उपस्थित रहावे असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे. बीड येथील स.मा. गर्गे भवन येथील वाचनालय सभागृहात रविवार दिनांक २३ जून रोजी सकाळी ११ वाजता वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता १० वी आणि १२ वी वर्गामध्ये विशेष प्राविण्यासह प्राप्त झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. या पुरस्कारास पात्र असलेल्या वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता १० वी आणि १२ वीत किमान ७५ टक्के गुण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ९४२२७४४६०५ प्रतिष्ठानचे सचिव विकास स्वामी यांच्या व्हाट्सअप नंबर वर आपला मार्क्स मेमो, स्वतःचा पासपोर्ट फोटो, संपर्क नंबर, संपूर्ण पत्तासह २१ जून पर्यंत नोंदणी करावी. सदरील पुरस्कार हा गुरुवर्य यांच्या पावन उपस्थिती मध्ये तसेच प्रशासनातील अधिकारी गौरीशंकर स्वामी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई आणि बीड यांच्या शुभहस्ते तसेच माध्यमातील प्रतिष्ठित पत्रकार यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहे. नोंदणी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यां मधून सर्वोत्कृष्ट टक्केवारीनुसार प्रथम, द्वितीय तृतीय आणि उत्तेजनार्थ असे मिळालेल्या मार्क्स टक्केवारी वरून क्रमांक काढले जातील. या विद्यार्थ्यांना रोख बक्षीसासह सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात



येईल. त्याचबरोबर ७५ टक्के पेक्षा जास्त असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र देऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दिली जाईल. जगद्विवेक प्रतिष्ठानच्या संस्थापिका स्वर्गीय जगदेवी विवेक स्वामी यांच्या ७२ व्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी वीरशैव लिंगायत समाजातील विद्यार्थ्यांना गौरांकित करण्यात येणार आहे. यासाठी पात्र विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी वरील व्हाट्सअप नंबर वर संपर्क करून नोंदणी करावी असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने सचिव विकास स्वामी, अध्यक्ष वैभव स्वामी, विश्वस्त वैशाली अशोक पडोळे, रूपाली श्रीकांत स्वामी यासह समस्त स्वामी येळंबकर सदस्य यांनी केले आहे.

**पत्रकारांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार**

प्रिंट मीडिया इलेक्ट्रॉनिक मीडिया सोशल मीडिया अंतर्गत पत्रकारांसह या क्षेत्रात विविध विभागांमध्ये काम करणाऱ्यांच्या ज्या पाल्याने ८० टक्के पेक्षा अधिक गुण घेतले असतील अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा देखील विशेष सन्मान या सोहळ्यामध्ये करण्यात येणार आहे. जे विद्यार्थी इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेत ८० टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन विशेष प्राविण्यात उत्तीर्ण झालेले आहेत.अशा पत्रकारांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. अशा गुणवंत विद्यार्थ्यांनी ९८२२६२८५२१ या व्हाट्सअप नंबर वर मार्क्स मेमो, आपला मोबाईल नंबर, संपूर्ण पत्ता, पासपोर्ट फोटो पाठवून 21 जून पर्यंत नोंदणी करावी. असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष वैभव स्वामी यांनी केले आहे.

# पुढील चार दिवस किनारपट्टीसह पश्चिम घाटाच्या परिसरात चांगला पाऊस होण्याचा अंदाज

**मुंबई/प्रतिनिधी**

मागील आठवडाभरापासून मोसमी पावसाची आगेकूच रखडली होती. पावसाचा जोरही कमी झाला होता. मात्र, आता अरबी समुद्रावरून येणाऱ्या नैऋत्य मोसमी पावसाचा जोर वाढला आहे. पुढील चार दिवस किनारपट्टीसह पश्चिम घाटाच्या परिसरात चांगला पाऊस होण्याचा अंदाज आहे. राज्यात सहा जून रोजी दाखल झालेल्या मोसमी पावसाने दहा जूनपर्यंत राज्यात वेगाने प्रगती केली. दहा जून रोजी मोसमी पाऊस जळगाव, अकोला, चंद्रपुरात दाखल झाला. पण, त्यानंतर बुधवारपर्यंत (१९ जून) मोसमी पाऊस तिथेच रेंगाळला आहे.आता मोसमी पावसाची अरबी समुद्रावरील शाखा जोर धरत आहे. अरबी समुद्रावरून येणारे नैऋत्य मोसमी वारे वेगाने किनारपट्टीकडे येत आहेत. त्यामुळे पुढील चार दिवस संपूर्ण किनारपट्टीसह पश्चिम घाटाच्या परिसरात पावसाचा जोर वाढणार आहे. राज्याच्या अन्य भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी व्यक्त केली आहे.हवामान विभागाने सिंधुदुर्गपासून ठाण्यापर्यंत संपूर्ण किनारपट्टीला पुढील चार दिवस पिवळा इशारा दिला आहे. पुढील चार दिवस मुंबईसह किनारपट्टीवर मध्यम ते जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. पश्चिम घाटाच्या परिसरात प्रामुख्याने पुणे, सातारा जिल्ह्यांत पावसाचा जोर राहणार आहे. दरम्यान, किनारपट्टीवर बुधवारी (१९ जून) पावसाने हजेरी लावली. बुधवारी दिवसभरात अलिबागमध्ये ३८, डहाणूत ५८, हर्णेत ११, सांताक्रुजमध्ये ६ आणि रत्नागिरीत १४ मिमी पाऊस पडला आहे.

# आरोग्यदूत अमर जाधव यांचा डॉ. बी. आर. आंबेडकर राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान!

सातारा (गुरुदत्त वाकदेकर) : वाई तथा 'विराटनगरी' मधील शेंदूरजणे या गांवचे सुपुत्र अमर जाधव यांच्या समाजसेवा तथा आरोग्य सेवाकार्याची दखल घेऊन निशा फाऊंडेशन बेंगलोर (कर्नाटक राज्य) यांनी त्यांच्या समाजसेवा कार्याच्या सन्मानार्थ त्यांना डॉ. बी. आर. आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार २०२४ या अत्युच्च मानाच्या अलौकिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. निराधार, बेघर आणि अनाथ रुग्णांच्या असंख्य दुःखमय वेदनानांवर सुखाची हळुवार फुंकर घालत, त्यांची प्रेममायेने विचारपूस करून, त्यांच्या दुःखाला आपलंच दुःख समजून, निराकारपणे आपल्या वाट्याचं उरलं सुरलं सुख त्यांना आस्थेने देणारे, त्यांच्या दुःखाला सुखात बदलण्यासाठी अहोरात्र धडपडणारे, नि:स्वार्थ वृत्तीने मदत करणारे, आरोग्यदूत अमर जाधव हे मुंबईतील एका नामवंत सिक्युरिटी गार्ड कंपनीत सुपरवायझर म्हणून कार्यरत आहेत. आपला उदरनिर्वाह करत त्यांनी जनसामान्यांच्या आरोग्यसेवेसाठी स्वतःला अहोरात्र झोकून दिले आहे. छत्रपती शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर, जिजाऊ, अहिल्यादेवी, सावित्रीमाई, रमाई, मदर टेरेसा यांच्या विचार वारसाने झपाटलेल्या अमर जाधव यांच्या अंत:करणात समाजातील रुग्णांप्रति मायेचा ओलावा आहे. स्वतः चा क्षुद्र स्वार्थ विसरुन केवळ परसेवेसाठी आणि परोपकारासाठी देह झिजवण्याची उच्चतम क्षमता त्यांच्यात आहे.

# स्वत:च्या क्षमता ओळखून त्यानुसार शैक्षणिक क्षेत्राची निवड करावी
## शनी मंदिर देवस्थानच्या वतीने गुणवंतांचा गौरव करताना मान्यवरांचे प्रतिपादन

**बीड (प्रतिनिधी)**

विद्यार्थ्यांनी दहावी, बारावीच्या गुणांच्या टक्केवारीवर न जाता आपल्या स्वतःच्या आतील क्षमता ओळखल्या पाहिजेत आणि त्या क्षमता ओळखूनच काय व्हायचं ते क्षेत्र निवडलं पाहिजे. फक्त डॉक्टर आणि इंजिनियर हे दोनच क्षेत्र नाहीत. या व्यतिरिक्त हजारो क्षेत्र उपलब्ध आहेत त्यांचाही विद्यार्थ्यांनी नक्की विचार करावा. मोठं होत असताना आपल्या आई वडीलाना कायम नजरेसमोर ठेवावं, चांगल्या मित्र-मैत्रिणींची संगत धरावी. जीवनामध्ये अशक्य काहीच नाही फक्त मनाचं धैर्य आणि जिद्द असावी लागते. अभ्यासाबरोबर स्वतःच्या शरीराच्या आरोग्याकडेही लक्ष द्यावे असा काहीसा गुणवंतांच्या गुणगौरव समारंभात बोलताना मान्यवरांच्या बोलण्यातील रोख दिसून आला. संपूर्ण भारत देशामध्ये सुप्रसिद्ध असणारे शनी देवाच्या साडेतीन पिठापैकी अर्धशक्तीपीठ असणारे बीड शहराचे सांस्कृतिक, ऐतिहासिक व धार्मिक वैभव श्री क्षेत्र शनी देवस्थानच्या वतीने वैद्यकीय प्रवेश पूर्व परीक्षा नीट, इयत्ता बारावी, इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष दैनिक चंपावतीपत्रचे संपादक जेष्ठ पत्रकार



नामदेवरावजी क्षीरसागर, प्रमुख पाहुणे जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिराचे संस्थापक प्राचार्य परशुराम महाराज मराडे, दैनिक लोकाशाचे संपादक तथा उद्योजक विजयराज बंब, दैनिक सकाळचे जिल्हा प्रतिनिधी दत्ताजी देशमुख, कीर्तनकार व श्री शिवाजी विद्यालय बीडचे पर्यवेक्षक ह.भ.प.त्रिंबक महाराज मातकर इ. उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज व शनी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सामूहिक जिजाऊ वंदना, देवस्थान समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत व स्वागतानंतर मान्यवरांचे उद्बोधक मनोगत संपन्न झाले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नीट परीक्षेमध्ये उत्तम गुण मिळवणारे पवन धांडे, प्राजक्ता घुमरे, राज थापडे, ऋषिकेश राहाडे यांचा, त्याचप्रमाणे बारावीमध्ये उत्तम गुण घेणाऱ्या तसेच इयत्ता दहावी परीक्षेमध्ये प्रत्येक शाळेतून गुणवंत ठरलेल्या प्रत्येकी दहा विद्यार्थ्यांचा संस्थांनच्या वतीने गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी पत्रकार भागवत तावरे, सुनील क्षीरसागर, राजेश बंब, शरद चव्हाण, सार्थक जोशी यांच्यासह मोठ्या संख्येने पालक, शनिभक्त व बीड शहरातील व ग्रामीण भागातील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री क्षेत्र शनी देवस्थानचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते रामनाथ भाऊ खोड, गणेश मस्के, श्रीकृष्ण महाराज उबाळे, संतोष महाराज डोंगरे, सुशील जटाळ, आदित्य पाणगुडे यांनी विशेष मेहनत घेतली.

# शहादा येथे गुजर नाभिक समाजातर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

श्री संतसेना नाभिक शिक्षण समितीच्या विद्यमाने शैक्षणिक साहित्य आणि शिष्यवृती वितरण आणि सेवापूर्ती समारंभ नुकताच श्री संतसेना समाज भुवन रामदेव बाबा नगर शहादा येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाभिक समाजाचे अध्यक्ष उद्धव जांभळे आणि शहादा तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन मकरंद पाटील, मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा ग्रुपचे प्रमुख आर एस पी अधिकारी युनिट कमांडर डॉ. मनिलाल रतिलाल शिंपी, शहादा तालुक्यातील प्रसिद्ध आरोग्य सेवक डॉ. किशोर आमोदकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संतसेना महाराज प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

नाभिक समाजातील मातृछत्र तसेच पितृछत्र हरपलेल्या मूला-मुलींना श्री संतसेना शिष्यवृतीचे वितरण शहादा व तळोदा मतदार संघातील लोकप्रिय आमदार राजेश पाडवी व शहादा तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन मकरंद पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

# तरुणीला पोलिस भरतीचे आमिष; बीड एसपींच्या तत्कालीन स्टेनोसह चौघांवर गुन्हा

**बीड/प्रतिनिधी** पोलिस दलात भरती करून देतो, असे म्हणत बीडमधील एका अनाथ तरुणीकडून १ लाख रुपये उकळले. त्यातील १७ हजार रुपये परत केले. परंतु राहिलेले ८३ हजार रुपये परत न करता शिवीगाळ करून फसवणूक केली. याप्रकरणी बीडचे पोलिस अधीक्षक यांचे तत्कालीन स्टेनो सुरेश काथार यांच्यासह चौघांविरोधात बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सुरेश काथार, संजय कुलकर्णी, पंढरी जायनुरे आणि चिंतन गारगोटे, अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.बीड शहरातील २५ वर्षीय तरुणी पोलिस भरतीची तयारी करत आहे. तिची एप्रिल २०२३ मध्ये जिल्हा रुग्णालयात संजय कुलकर्णी यांच्यासोबत ओळख झाली. त्यांनी पोलिस अधीक्षक यांचे तत्कालीन स्टेनो सुरेश काथार यांच्यासोबत २४ एप्रिल २०२३ रोजी ओळख करून दिली. काथार यांनी नांदेडच्या पंढरी जायनुरे/मिसे याचा संपर्क क्रमांक दिला आणि ५० हजार रुपये द्यावे लागतील, असे सांगितले. त्यानंतर त्यांच्यात संवाद होत राहिला. याच दरम्यान तरूणीने मुंबई शहरची पोलिस भरती परीक्षा दिली होती. चांगले गुण असतानाही तिला प्रतीक्षेत ठेवले. त्यामुळे तिने पंढरीला कॉल करून मी काही करता येते का पाहा, असे सांगितले. त्यानंतर पंढरीने तिला जून २०२३मध्ये पुणे येथे बोलावले. तेथे चिंतन हनुमंत गारगोटे हा अँटी करप्शन ब्यूरोचा अधिकारी आहे, असे सांगून ओळख करून दिली. यावेळी त्याने आगोदर दोन मुलांचे १० लाख रुपये घेऊन काम केल्याचे दाखवले. परंतु तू मुलगी असल्याने तू पाच लाख रुपये दे, असे सांगितले. परंतु पैसे नसल्याने तरूणीने परत बीड गाठले. तरीही त्यांचे कॉल चालूच राहिले. त्यांनी एक लाख रुपयांची मागणी केली. यावर तरूणीने पुणे येथे जाऊन त्यांना ते पैसे दिले. काही दिवसांनी मुंबई शहरची अंतिम यादी लागली. यामध्ये तरूणीचे नाव नव्हते. यावर तिने विचारले असता सर्वांनीच उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर काही दिवसांनी पंढरी याने १७ हजार रुपये फोन पेवर परत पाठविले तर २५ हजार रुपयांचा चेक दिला. परंतु हा चेक वटला नाही. त्यानंतर वारंवार संपर्क करून पैसे मागितल्यावरही ते दिले नाहीत. उलट शिवीगाळ केली. त्यामुळे आपली ८३ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप करत तरूणीने बीड शहर पोलिस ठाणे गाठून चौघांविरोधात फिर्याद दिली.

**सुरेश काथार झाले निवृत्त...**

सुरेश काथार हे बीडमध्ये असताना वादग्रस्त ठरले. अनेक अधिकाऱ्यांनी त्यांच्याविरोधात पोलिस अधीक्षकांकडे तक्रारी केल्या होत्या. २०२३ मध्येच काथार हे सेवा निवृत्त झाले आहेत. कार्यरत असतानाच त्यांनी तरुणीला आमिष दाखवून फसवणूक केल्याचा आरोप आहे. आता त्यांच्यावर गुन्हा दाखल झाल्याने खळबळ उडाली आहे.

# विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनात १५ आरोग्यदायी पदार्थांचा समावेश फक्त कागदावरच ; मोफत गणवेश मिळणार कधी?!:- डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश:- प्रधानमंत्री**

पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन पोषण आहारामध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या १५ पाककृती निश्चित करण्यात आल्या असुन ३ संरचित आहार पद्धती नुसार व्हेजिटेबल पुलाव, नाचणी सत्त्व,अंडा पुलाव,तांदळाची खिचडी अशा पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची खिचडीपासुन सुटका होणार असुन निश्चित केलेल्या पाककृती मध्ये व्हेजिटेबल पुलाव,अंडा पुलाव,मसाले भात,मोड आलेली मटकीची उसळ, मटार पुलाव,गोड खिचडी,मुगडाळ, खिचडी,चवळी खिचडी,मुग,शेवगा,वरण भात,तांदळाची खीर,चणा पुलाव, नाचणीचे सत्त्व, सोयाबीन पुलाव,मोड आलेले कडधान्य आदी.१५ पदार्थांचा आस्वाद घेता येणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात येत आहे मात्र वस्तुस्थिती वेगळीच असुन सद्यस्थितीत तांदळापासून बनविलेल्या पाककृतीच्या स्वरूपात पोषण आहार दिला जात आहे. शालेय पोषण आहार पुरवठादार महाग वस्तुंची कमतरता दाखवून स्वस्त असणा-या मटकी, हरभरा,वाटाणा, मसुर,मुगदाळ यांचाच शाळांना पुरवठा करण्यात येत आहे.केंद्र शासनाने दिलेल्या सुचनेनुसार विद्यार्थ्यांना



दिल्या जाणाऱ्या आहारामध्ये स्थानिक पातळीवर उपलब्ध अन्नधान्य, तृणधान्य व अन्य पदार्थांचा समावेश करून आहाराचा दर्जा आणि पौष्टिकता वाढविणे, आहारात वैविध्य आणण्यासाठी पाककृती सुधारणा समिती नियुक्त करण्यात आली होती.

उन्हाळ्यात प्यायला पाणी नाही , परसबागेतील भाजीपाला आहारात मिळणार कधी??

शिक्षण विभागाकडून पात्र शाळांमध्ये निर्माण केल्या जात असलेल्या परसबागातुन उत्पादीत भाजीपाला,फळे यांचा समावेश विद्यार्थ्यांच्या आहारात होत असल्याने विद्यार्थ्यांना ताजा,सकस आहार मिळण्यास मदत होत असल्याचे नमूद केले आहे. मात्र जिल्ह्यातील किती शाळांमध्ये परसबाग आहे आणि मुख्य म्हणजे उन्हाळ्यात विद्यार्थ्यांना प्यायला पाणी नाही आणि परसबाग कशी जगवायची असा प्रश्न शाळेतील शिक्षकांनी उपस्थित केला असुन केवळ कागदावर छान असणारी योजना वास्तवात मात्र उतरताना दिसत नाही.


मोफत गणवेश आणि बुट सॉक्स मिळणार कधी???

राज्यात" एक राज्य एक गणवेश" योजनेची अंमलबजावणी २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येत असून या अंतर्गत शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इयत्ता पहिली ते आठवी सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला असुन यामध्ये एक नियमित स्वरुपाचा गणवेश तर स्काऊट व गाईड या विषयासाठी दुसरा गणवेश असणार आहे.महिला आर्थिक विकास महामंडळाकडून गणवेशाच्या शिलाईचे काम सुरू असुन लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात येत असली तरी नेमका गणवेश मिळणार कधी?? हा प्रश्न पालकांनी उपस्थित केला आहे.गणवेशा बरोबरच मुलांना बुट आणि सॉक्स सुद्धा मिळाले नाहीत.गतवर्षी एका विद्यार्थ्यांसाठी एक बुट जोडी आणि दोन सॉक्स जोड यासाठी १७० रूपये निधी देण्यात आला होता.यावरुन कोणत्या दर्जाचे साहित्य मिळत असेल याची कल्पनाच न केलेली बरी.

# शिवभूमी विद्यालयातील उपक्रमशील शिक्षिका साहित्यीका कवयिची यांचे तिसरे पुस्तकमनातल्या कविता काव्यसंग्रहाचे प्रकाशन निगडी परिसरात संपन्न

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व राजपूत समाज संगठन पिंपरी चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने 9 जून 2024 रोजी निगडी येथील महाराणा प्रताप उद्यान विद्यालयात राजे महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेले राष्ट्रभक्ती पर कवितांचा सुरेख संगम काव्यसंमेलन अतिशय उत्साहात संपन्न झाले सदर कवी संमेलनाच्या सुरुवातीला त्यांच्या पुतळ्याला हार घालून व पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली तसेच महाराणा प्रताप यांचा पोवाडा सादर केला गेला यावेळी निगडी मधील नगरसेवक मा .श्री केंदळे , मा पवळे मॅडम मा जगताप सर मा चिखले सर आदी मान्यवर उपस्थित होते त्यांच्या हस्ते श्रीमती कोठेकर यांचा सन्मान करण्यात आला . तसेच उपस्थित मा श्री बायस ,प्रकाश देवरे,दिनेश पाटील,माऊली जगताप,जितेंद्र पाटील,प्रविण राजपूत, सुरेश सुर्यवंशी,परीहार मॅडम यांच्या हस्ते प्रथम सत्रात श्रीम कोठेकर योगिता लिखित ' मनातल्या कविता काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले तसेच त्यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सुरुवात केली त्यानंतर समाजसेवक मा श्री नाणेकर सर ,मा धनंजय इंगळे, मा सामाजिक कार्यकर्ते बायस सर , मा पुरुषोत्तम हिंगणकरसर ,आम्रपाली धेंडे यांना व्यासपिठावर आमंत्रित केले गेले संमेलनाच्या आयोजक श्रीम.कोठेकर योगिता यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्वांना पुष्प देऊन स्वागत केले तसेच कवी संमेलनाच्या सूत्रसंचालिका मा सौ राजश्री मराठे यांनी आपल्या मधुर आवाजात स्वागत गीत सादर करून सर्व मान्यवरांचे स्वागत केले आणि कवी संमेलनाची रंजकता वाढवली त्यानंतर उपस्थित मान्यवर व कवी संमेलनाचे अध्यक्ष पाहुणे यांना पुष्पगुच्छ सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला

# राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त....




वर्ल्ड व्हिजन संस्था मुंबई या संस्थेने राज्यस्तरीय मराठी चित्रपट समीक्षा स्पर्धा2024आयोजित केली होती.

या राज्यस्तरीय मराठी चित्रपट समीक्षा लेखन स्पर्धेत मला मानाचा " तृतीय पुरस्कार " लाभलाहा आनंददायी समाचार माझ्या कविता, चारोळी वाचकांना सांगताना मला अतिशय आनंद होत आहे. या राज्यस्तरीय मराठी चित्रपट समीक्षा मी प्रथमच भाग घेऊन मी नुकताच प्रदर्शित झालेला "जुनं फर्निचर "या मराठी चित्रपटाचे परिक्षण करून त्यावर समीक्षा लेख लिहून या स्पर्धेत पाठविला होता. त्या लेखाला " राज्यस्तरीय मराठी चित्रपट समीक्षा स्पर्धा 2024चा सन्मानाचा तृतीय पुरस्कार " लाभला..

# अंबाजोगाईत संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्ता बैठकीचे आयोजन

# संभाजी ब्रिगेडची विचारधारा समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोंचवणार – जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे

## गोविंद हाके यांची तालुका कार्याध्यक्ष या पदावर नियुक्ती

**अंबाजोगाई** आगामी काळात होवू घातलेल्या महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पुर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी शहरात संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्ता बैठकीचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या बैठकीत जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी गोविंद हाके यांची तालुका कार्याध्यक्ष या पदावर नियुक्ती करण्यात आली.





# काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा. रजनीताई पाटील यांच्यावर आता तीन राज्याची जबाबदारी !

**केज/प्रतिनिधी** काँग्रेसच्या खासदार तथा ज्येष्ठ नेत्या खा.रजनीताई अशोकराव पाटील यांच्यावर पक्षाने पुन्हा एक मोठी जबाबदारी दिली असून रजनीताई यांचेकडे आता तीन राज्यांची जबाबदारी देण्यात आली असून पक्षाने प्रसिद्ध केलेल्या या यादीनुसार त्यांचेवर इतरांपेक्षा मोठी अर्थात तीन राज्यांची जबाबदारी असणाऱ्या त्या एकमेव नेत्या आहेत. गांधी घराण्याशी असलेली निष्ठा व पक्षातील एक विश्वासू नेत्या म्हणून नेहमीच त्यांच्यावर मोठी जबाबदारी पक्षाने सोपवलेली आहे व ताईंनी देखील तेवढ्याच जबाबदारीने पक्षाचे काम केलेले आहे. यावेळी त्यांच्याकडे दिल्ली, उत्तराखंड व हिमाचल प्रदेश या तीन राज्याच्या लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाची कारणे शोधण्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाने त्यांच्यावर सर्वात मोठी जबाबदारी दिली असून तीन राज्याची जबाबदारी असलेल्या त्या एकमेव नेत्या आहेत. संसद पटू म्हणून राज्यसभा गाजवणाऱ्या सरकारला धारेवर धरणाऱ्या काँग्रेसच्या प्रभावी महिला नेत्या म्हणून त्यांचे नाव आहे. यापूर्वीही ज्या राज्यांची जबाबदारी त्यांच्यावरती दिली त्यांनी ती यशस्वीपणे पार पाडली आहे. पक्षाने त्यांच्यावर दिलेली जबाबदारी त्या सक्षमपणे पार पडतील

आजपर्यंत पक्षाने माझ्यावर दिलेल्या सर्व जबाबदाऱ्या मी सक्षमपणे निभावल्या आहेत. आज पुन्हा काँग्रेस पक्षाने माझ्यावर मोठी जबाबदारी दिलेली आहे. तीनही राज्यात सर्वत्र फिरून यावरती विचार मंथन केले जाईल व या राज्यात काँग्रेसला का पराभवाचा सामना करावा लागला याची उत्तर शोधून ती आम्ही पक्षाकडे व आमच्या नेतृत्वाकडे देऊ आणि निश्चितपणे आगामी काळात काँग्रेस पक्ष देशातील सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे येईल यात शंका नाही.
**- रजनीताई पाटील (खासदार, राज्यसभा)**

# गुजरात पावागड येथे झालेल्या घटनेच्या विरोधात जैन समाजाचे आंदोलन.

**पुणे/प्रतिनिधी**

16 जून 2024 रोजी पावागड, गुजरात येथे अति प्राचीन जैन मूर्तींची विटंबना करण्यात आली. तसेच जैन साधू संतांवरील हल्ले व प्राचीन जैन तीर्थान वर अतिक्रमण मोठ्या प्रमाणावर होत आहे व शांतिप्रिय जैन समाजाला वेळोवेळी अशा विविध आघातांना सामोरे जावे लागत आहे. पावागड येथील दोशींवर तत्काल कारवाई झाली पाहिजे या मागणीसाठी सकल जैन समाज व राष्ट्रीय जैन सेनेच्या वतीने १९ जून २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता पत्रा गल्ली रामोशी गेट येथून कलेक्टर ऑफिस पर्यंत भव्य मोर्चा आयोजित करण्यात आला. पंचमहाल जिल्ह्यात असलेल्या पावागड जैन धर्मासाठी परम श्रद्धेचे प्रतीक आहे आणि या विडंबनात्मक घटनेने जैन समाज दुखावला आहे, संतप्त झाला आहे. या अत्यंत निंदनीय घटनेची पंतप्रधान,



केंद्रीय गृहमंत्री, केंद्रीय सांस्कृतिक मंत्री, पुरातत्व विभाग आणि गुजरात सरकार ने दखल घेत हस्तक्षेप करावा व हे निंदनीय कृत्य करणाऱ्या सर्वांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी जैन समाजाच्या वतीने करण्यात आली. तसेच जैन साधुसंतांवरील हल्ले व प्राचीन जैन तीर्थांवर असमाजिक तत्त्वांतारे वेळोवेळी होणारे अतिक्रमण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सदर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते अशी माहिती अचलभाई जैन, संदीप भंडारी, बाळासाहेब धोका, महेंद्र सुंदेचा यांनी दिली. मोर्चाचे नेतृत्व क्रांतिकारी जैन आचार्य विराज सागर जी महाराज यांनी केले. मोर्चात प्रामुख्याने महावीर कटारिया, अभय छाजेड, मयुर सरनोत (वरवंडकर),श्रीमल बेदमुथा, विनोद सोलंकी, निमेश शहा, राजेश सालेचा,संदेश बेदमुथा, सतीश पाटील, प्रकाश बोरा, प्रीतम जैन, अभिजीत शहा, पंकज मेहता, अक्षय परमार, उमेश ओसवाल, आशिष कटारिया, ऋषिकेश शहा, पार्थ वखारिया, प्रकाश बाफना, विपुल बाफना, मितेश जैन, स्मितेश चौहान, प्रीति पाटील, रसिला राठोड, श्रुती मेहता, हेमलता भंडारी, सौरभ धोका, उम्मेदमल धोका, संजय मंडलेचा, यांच्यासह हजारो जैन बांधव व भगिनी सहभागी झाले होते.

## टी20 विश्वचषक 2024 च्या सुपर-8 मध्ये पोहोचले हे संघ, जाणून घ्या पूर्ण वेळापत्रक

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : २ जूनपासून सुरू झालेल्या टी२० विश्वचषकाचा पहिला टप्पा उद्या सकाळी होणाऱ्या वेस्ट इंडिज विरुद्ध अफगाणिस्तान सामन्याने संपणार आहे. २० संघांसह सुरू झालेली ही स्पर्धा आता ८ संघांवर आली आहे. न्यूझीलंड, पाकिस्तान, श्रीलंका यासारखे बलाढ्य संघ बाहेर पडले आहेत, तर पहिल्यांदाच ही स्पर्धा खेळणाऱ्या अमेरिकेने पुढच्या फेरीत प्रवेश केला आहे. आता या स्पर्धेतील सुपर-८ संघांची दोन नवीन गटांमध्ये विभागणी करण्यात आली असून, त्यांच्यामध्ये चुरशीची लढत होणार आहे. प्रत्येक गटातून दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील आणि नंतर बाद फेरीनंतर अंतिम सामना होईल. भारत, अमेरिका (गट अ), ऑस्ट्रेलिया, इंग्लंड (गट ब), अफगाणिस्तान, वेस्ट इंडिज (गट क), दक्षिण आफ्रिका, बांगलादेश (गट ड) हे संघ सुपर-८साठी पात्र ठरले आहेत, तर पाकिस्तान, आयर्लंड, कॅनडा, स्कॉटलंड, नामिबिया, न्यूझीलंड, पापुआ न्यू गिनी, ओमान, श्रीलंका, नेदरलँड आणि नेपाळ हे संघ पहिल्या फेरीतच स्पर्धेतून बाहेर पडले आहेत. सुपर-८च्या गट-१ मध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या संघांचा समावेश आहे, तर गट-२ मध्ये इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज आणि अमेरिका यांचा समावेश आहे.

# कर्तव्यात कसूर ? करणारे बीडीओं ? यांचा चुकार ग्रामसेवकांच्या डोक्यावर हात ?केज तालुक्यात बायोमेट्रिक हजेरी प्रणालीला मुहुर्त कधी ?

## ग्रामसेवकांची मनमानी, ग्रामस्थ हैराण !अक्षय गोटेगावकर यांची कारवाईची मागणी!

**केज/प्रतिनिधी**

गोटेगावसह केज तालुक्यांतील ग्रामपंचायतींमध्ये बायोमेट्रिक प्रणाली बसविण्याचे आदेश काढून, कार्यवाही केल्याचा अहवाल सादर करण्याच्या सूचना गटविकास अधिकाऱ्यांनी दिल्या होत्या?मात्र, अनेक ग्रामपंचायतींनी बायोमेट्रिक प्रणाली बसविली नसून, ग्रामसेवकांनी गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखविल्याचे केज तालुक्यात दिसून येत आहे. केज तालुक्यातील अनेक ग्रामसेवक कामाच्या ठिकाणी हजर राहत नसल्याचे तसेच आठवडा आठवडा गायब असल्याचे चित्र केज तालुक्यात पाहावयास मिळते. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांचा त्यांच्यावर वचक आहे की नाही असा प्रश्न ग्रामस्थांना पडत आहे. याबाबत वरिष्ठांकडे तक्रारी करूनही कुठलीही कारवाई झाली नाही. ग्रामसेवक अनेक दिवस कामकाजस्थळी हजर राहत नसल्याने नागरिकांची कामे मोठ्या प्रमाणावर खोळंबली आहेत. त्यामुळे अनेक ग्रामपंचायतीचा कारभार रामभरोसे चालला असून, याबाबत वरिष्ठ अधिकारी कधी लक्ष घालणार, असा सवाल उपस्थित होत आहे. मागील काही महिन्यापूर्वी अनेक ग्रामसेवक कामाचे गाव सोडून इतर गावात कामकाज करत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सम्यक विद्यार्थी आंदोलन व ज्ञानमाता माहिती अधिकार कार्यकर्ते नागरिक समूह महाराष्ट्र राज्याचे नेते अक्षय गोटेगावकर यांनी केज तालुक्यातील शासकीय कामाचा सावळागोंधळ उघड केला होता. एखादा ग्रामसेवक सज्जाचे गाव सोडून दुसऱ्या ठिकाणी प्रोसिडिंग बुकवर किंवा निधी कसा देवाण-घेवाण करू शकतो, याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालण्याची गरज होती. मात्र नोटीस काढूनही ग्रामसेवक वरिष्ठांचे एकच नसतील तर, वरिष्ठांचा धाक



उरला आहे की नाही, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. माहिती अधिकार कार्यकर्ते अक्षय गोटेगावकर यांनी याबाबत तक्रार करत तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीत बायोमेट्रिक प्रणालीवर प्रश्न उपस्थित करून ती बसविण्याची मागणी केली होती. त्यावर गटविकास अधिकाऱ्यांनी लेखी आदेश ही काढला होता. बायोमेट्रिक प्रणाली बसवून, तसा कार्यवाही अहवाल सादर करण्याचे सांगितले होते. मात्र, अनेक ग्रामपंचायतींनी बायोमेट्रिक प्रणाली बसविलीच नाही. ग्रामसेवकांनी या आदेशाला केराची टोपली दाखविल्याचे दिसून येत आहे. या ग्रामसेवकांवर वरिष्ठ अधिकारी काय कारवाई करतात, याकडे केज तालुक्याचे लक्ष लागले आहे. ग्रामसेवकांवर कारवाई करा तक्रार केल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीत बायोमेट्रिक प्रणाली बसविणे बंधनकारक केले आहे. मात्र, सद्यस्थितीत अनेक ग्रामपंचायतीते बायोमेट्रिक प्रणाली बसविण्यात आलेली नाही. वरिष्ठांचा आदेश न मानणाऱ्या ग्रामसेवकांवर शिस्तभंगासह प्रचलित कायद्यानुसार फौजदारी खटला भरून कारवाई करण्याची मागणी सम्यक विद्यार्थी आंदोलन व ज्ञानमाता माहिती अधिकार कार्यकर्ते नागरिक समूह महाराष्ट्र राज्याचे नेते अक्षय गोटेगावकर यांनी केली आहे...

### बायोमेट्रिक प्रणालीमुळे उपस्थितिचे बंधन

अनेक ग्रामसेवक कामकाजाच्या स्थळी हजर राहत नाहीत. मात्र शासन दप्तरी हजर असल्याचे दाखविले जाते. त्यामुळे शासनाची फसवणूक होऊन नागरिकांची कामे खोळंबतात. बायोमेट्रिक प्रणालीद्वारे ग्रामसेवकांनी कामाची हजेरी लावणे बंधनकारक असते. त्यामुळे त्यांच्यावर शासकीय नियंत्रण राहील, शिवाय ते उलटतपासणी साठी सोपे होते असे गोटेगावकरांनी सांगितले.

दैनिक वादळ वार्तहि पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनूडिजिटल छापन संपू ादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 के ज येथन तू यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित के ले आहे ( वाद के ज / बीड न्यायालय अंतर्गत )